# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**विदर्भातील मिहान, सेझ आणि दुसऱ्या धावपट्टीचा विकास प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१) १२९ (१५-१२-०१५०). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील मिहान, सेझ आणि दुसऱ्या धावपट्टीचा विकास प्रकल्प अपूर्णावस्थेत असून तो पूर्ण करण्यात येईल असे मा. मुख्यमंत्री यांनी माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये वा त्यासुमारास आश्वासन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना १२.५ टक्के विकसित जमिन देण्याबाबत व सदरहू प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :** (१) मिहान प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने प्रकल्पातील सर्व प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिल्या आहेत.
(२) व (३) शासनाने प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड किंवा त्याऐवजी सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय दि. ०७/१०/२०११ व दि. ०३/०३/२०१२ रोजी घेतला आहे. त्याप्रमाणे विकसित भूखंडासाठी ३७८ प्रकल्पग्रस्तांनी विकल्प दिला असून सानुग्रह अनुदानासाठी १११२ प्रकल्पग्रस्तांनी विकल्प दिला आहे. त्यापैकी ७३८ प्रकल्पग्रस्तांना रु. १५८.०८ कोटी अनुदानाचे वाटप केले आहे. विकसित भूखंड वाटपाची कार्यवाही लवकरच सुरु करण्यात येत आहे.
सदर प्रकल्पाकरिता शासनाने भूसंपादन व प्रकल्पबाधितांचे पुनवर्सन याकरिता रु. ८७६.०० कोटी वितरीत केले आहेत.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील राज्य रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२) १७५ (२२-१२-२०१४). श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील राज्य रस्त्यावरील जागोजागी डांबर उखडल्यामुळे वाहनधारकांची मोठी गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरील दुरुस्ती शासनाने तात्काळ करण्याची मागणी सातत्याने स्थानिक नागरिकांमधून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरूस्तीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) (३) व (४) तालुक्यातील राज्यमार्ग दर्जाच्या रस्त्यांवरील खड्डे भरुन रस्ते वाहतूकीसाठी योग्य ठेवण्या आले आहेत.

या रस्त्यांवर पडणाऱ्या खड्डयांबाबत प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे हाती घेऊन रस्ते वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील पोलीस पाटलांचे मानधनात वाढ करण्याबाबत

**(३) ५२४ (२२-१२-२०१४). श्री. गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. संजय कदम (दापोली), श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. बच्चू कडू (अचलपूर), श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. अनिल कदम (निफाड), श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटलांचे मानधन ७५००/- करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये शासनामार्फत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :** (१) पोलीस पाटील संघटनांच्या मागण्यांबाबत तत्कालिन मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १०.७.२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पोलीस पाटलांचे

सध्याचे मानधन रु. ३,०००/- वाढवून रु. ७,५००/- एवढे करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) त्या अनुषंगाने पोलीस पाटलांच्या मानधनात वाढ करण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरळ शहरातील (ता.कर्जत जि.रायगड) अवजड मालवाहतुकीच्या, वाहनांच्या बेकायदा पार्किंगबाबत**

**(४) ८३४ (१५-०१-२०१५). श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) या माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या शहरात वाहतूक कोंडीच्या समस्येने व अवजड मालवाहतुकीच्या, वाहनांच्या बेकायदा पार्किंगमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पार्किंग हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१५) :** (१) व (२) नेरळ शहरातील रस्ते अरुंद आहेत. तसेच, नेरळ बाजारपेठत पार्किंगसाठी अधिकृत जागा नाही आणि टपऱ्या/दुकानांचे रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे. सदर दुकानदार आणि शासन यांच्यत उच्च न्यायालयात प्रकरण सुरु आहे.
शहरातील रस्त्यांवर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर योग्य ती कारवाई करण्यात येते. तसेच, बाजारपेठेत दुपारी १.०० ते ४.०० दरम्यान माल खाली करण्यास व्यापारी, शांतता समिती, प्रतिष्ठित नागरिक आणि पोलीस यांच्यात बैठक घेऊन संमती देण्यात आली आहे. तसेच इतर वेळी माल खाली करण्यासाठी बाजारपेठेत वाहन उभे केले किंवा सदर वाहनामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यास वाहनांवर वेळोवेळी कायदेशिर कारवाई केली जाते. त्यासाठी वाहतूक पोलीस कर्मचारी यांची वाहतूक नियंत्रणासाठी नेमणूक केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पावर काम करणा-या सर्व कामगारांना कामगार कल्याण खात्यात जमा झालेल्या रक्कमेतून विनाविलंब लाभ मिळण्याबाबत**

**(५) १३६३ (२३-१२-२०१४). श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री. विलास तरे (बोईसर), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ. संजय रायमुलकर (मेहकर), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री. दिपक चव्हाण (फलटण), ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री. प्रशांत बंब (गंगापूर), श्री. संतोष दानवे (भोकरदन), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड), श्री. प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री. छगन भुजबळ (येवला), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या बिल्डींग ॲण्ड ऑर्डर कन्स्ट्रक्शन वर्करस वेल्फेअर सेस ॲक्ट, १९६६ च्या कायद्यानुसार १० लाखाहून अधिक रक्कमेचे बांधकाम प्रकल्प राबवणा-या व्यावसायिकांकडून बांधकाम प्रकल्पाच्या १ टक्के रक्कम कामगार कल्याणासाठी शासन वसूल करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २००८ साली बांधकाम प्रकल्पाची मर्यादा ५ लाखांपर्यंत खाली आणत ५ लाखाहून अधिक किंमतीचे बांधकाम प्रकल्प राबविणा-या बांधकाम व्यावसायिकांकडून ही रक्कम वसूल करण्यात येत असून सदर वसूल झालेली रक्कम बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या बॅक खात्यात ठेव स्वरुपात ठेवली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध बांधकाम प्रकल्पावर काम करणा-या कामगारांच्या कल्याणासाठी विकासकांकडून वसूल करण्यात आलेली २५०० कोटी रुपयांची रक्कम शासनाकडून जमा करण्यात आली असून आजमितीस त्यापैकी केवळ ६ टक्के रक्कम कामगार खात्याकडून पर्यायाने शासनाकडून खर्च करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी तालुके आणि राज्यातील बांधकाम प्रकल्पावर सुमारे १५ लाखांहून अधिक कामगार (मजूर) काम करीत असून त्यापैकी विक्रमगड तालुक्यासह आदिवासी बहुल तालुक्यांना जॉब आणि राज्य जॉब कार्डसह केवळ ७२ हजारांची नोंदणी झालेली असल्याने व अद्यापी अनेक कामगारांची नोंदणीच करण्यात आलेली नसल्याने कामगार कल्याण खात्यात जमा झालेल्या रक्कमेच्या लाभापासून या नोंदणी न झालेल्या कामगारांना वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पावर काम करणा-या सर्व कामगारांना (मजूरांना) कामगार कल्याण खात्यात जमा झालेल्या रक्कमेतून विनाविलंब लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०४-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, जमिनीचे मूल्य वगळता जी बांधकामे रु. १० लाखापेक्षा जास्त खर्चाची आहेत. अशा बांधकामे खर्चाच्या रकमेवर १% दराने उपकर वसूल केला जातो.

उपकरांतर्गत जमा झालेला रक्कम मंडळाच्या बचत खात्यावर जमा केली जाते व नंतर तिची राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतवणूक केली जाते.

(३) होय, हे खरे आहे.

सध्या मंडळाकडे रु. २७६५/- कोटी इतकी रक्कम उपकरांतर्गत जमा झालेली असून त्यापैकी बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी रु. १६३/- कोटी इतकी रक्कम खर्च झालेली आहे

(४) सध्या मंडळाकडे एकूण ३,३९,९६७ इतके बांधकाम कामगार नोंदीत आहेत. केवळ नोंदीत बांधकाम कामगारच मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरतात. त्यामुळे बांधकाम कामगारांना नोंदणीचे महत्व पटवून देऊन मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी व पर्यायाने अधिकाधिक बांधकाम कामगारांना मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(५) दिनांक १८ जून २०१४ च्या शासन निर्णयान्वये मंडळाच्या विविध योजनांचे लाभ प्रदान करण्याचे सर्व आधिकार जिल्हास्तरीय कार्यालयाला देण्यात आलेले आहेत.

---

## सहार एलीव्हेटेड रोड या प्रकल्पामधील बाधित होणा-या विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासीयांचे स्थलांतराबाबत

**(६) २०५८ (२३-१२-२०१४). श्री. पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सहार एलीवेटेड रोड या प्रकल्पामधील बाधीत होणा-या विमानतळ प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासीयांचे स्थलांतर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झोपडपट्टवासीयांमधील ज्यांनी दिनांक ०१ जानेवारी, २००० पूर्वी पासून असलेले झोपडे परंतू दिनांक ०१ जानेवारी, २००० नंतर विकत घेतलेल्या ‘हस्तांतरण’ Category मध्ये असल्याने अशा हस्तांतरीत झोपडपट्टीवासीयांना शासन पूर्नवसनास पात्र करतील या सापेक्ष ‘तात्पूर्ती’ घरे गोरेगाव येथे दिली आहेत, हे खरे आहे,

(३) सदर तात्पूर्त्या घरामध्ये रहाणा-यांना अजून किती दिवस ‘पात्र होण्याची’ आहे,

(४) सदर प्रकल्पबाधीतांना त्याच्या जून्या रहात्या घराजवळच कायमस्वरुपी घरे मिळावी यासाठी शासन त्वरीत कार्यवाही करेल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) विमानतळ प्रकल्पाकरीता पात्रतेच्या निकषात बदल करण्याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर स्वंतत्र निर्णय घेण्यात आलेला नाही. परंतु १.१.२००० पूर्वी पासून अस्तित्वात असलेल्या झोपडीत सध्या वास्तव्य करणाऱ्या झोपडीधारकास संरक्षण देण्याचे धोरण शासनाने

निश्चित केले असून त्यानुसार पात्र ठरणाऱ्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात येत आहे. सदर पात्रता निश्चितीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रहिवाश्यांना तात्पुरत्या पुनर्वसनाचा लाभ घेता येईल.
(४) सदर प्रकल्पग्रस्तांच्या जुन्या घरांजवळ पुनर्वसन पर्याय उपलब्ध न झाल्याने त्यांचे तेथे पुनर्वसन करता आले नाही. विमानतळ प्राधिकरण प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मे. एच.डी.आय.एल. विकासकाने किरोळ रोड, कुर्ला येथील प्रिमियर कंपाऊंड येथे झोपडपट्टीक पुनर्वसन करण्याकरिता कुर्ला प्रिमियर कंपाऊंड येथील इमारत क्रमांक आर-१८ व आर-१९ कडील इमारती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. मूलत: पात्र ठरलेल्या तसेच तात्पुरत्या स्वरुपात पुनर्वसन केलेल्या झोपडीधारकांपैकी पात्र होणाऱ्या झोपडीधारकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन कुर्ला प्रिमियर कंपाऊंड येथील इमारत क्रमांक आर-१८ व आर-१९ कडील इमारतीमध्ये करण्यात येत आहे.

---

**कामगार विभागामार्फत असंघटीत कामगारांचे जीवनमान उंचविण्यासाठी**
**विविध कल्याणकारी योजना सुरु करण्याबाबत**

**(७) २०६४ (२३-१२-२०१४). श्री. चंद्रदीप नरके (करवीर), श्री. उल्हास पाटील (शिरोळ), डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या कामगार विभागामार्फत असंघटीत कामगारांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये बांधकाम कामगांरासाठी आरोग्य व अपघात विमा योजना, व त्यांच्या १० वी पर्यंतच्या मुलांना टॅबलेट व १२ वी पर्यंतच्या मुलांना लॅपटॉप देण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जवळपास १५,००० कामगांराची नोंद कल्याणकारी मंडळाकडे झाली असताना व यापैकी २००० कामगारांची विविध योजनांसाठी प्रस्ताव सादर केले असताना केवळ १४६ प्रस्तावांना मान्यता मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्वरित प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(५) उर्वरित सर्व प्रलंबित प्रस्तावाना उक्त कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०४-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक कल्याणकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.
(२) होय, हे खरे आहे.
बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी चालू आहे. तथापि, बांधकाम कामगारांच्या मुलांना लॅपटॉप व टॅब वाटपाची योजना प्रलंबित आहे.

(३) हे खरे नाही.

संध्या मंडळाकडे ३,३९,००० इतके बांधकाम कामगार नोंदीत असून, त्यापैकी १८७० बांधकाम कामगारांनी मंडळामार्फत राबविलेल्या विविध योजनाचा लाभ घेतलेला आहे.

(४) नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाबाबतचे कोणतेही प्रस्ताव मंडळाकडे प्रलंबित नाहीत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी (ता. जि. परभणी) जिल्ह्यातील शहराकडे जाणा-या पिंगळी फाटा ते पिंगळी रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(८) २३९३ (२४-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील शहराकडे जाणा-या पिंगळी फाटा ते पिंगळी रस्त्याची दुरावस्था झाली असून रस्त्यावरील खड्डयामुळे मागील ६ महिन्यात अनेक अपघात होऊन अनेक जखमी व काहीचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या सुधारणेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच या कामासाठी किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) विषयांकीत लांबीमध्ये पडलेले खड्डे भरण्याचे काम करण्यात येत असून रस्त्याच्या सुधारणेचे काम निधी, निकष व मंजुरीच्या अधीत हाती घेण्याचे प्रयोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यान येथील दहिसर नदीवर श्रीकृष्णनगर येथे कोल्हापूर पद्धतीय बंधारा बांधून पाणी अडविण्याबाबत**

**(९) २४२७ (२३-१२-२०१४). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्‌यानात दहिसर नदीवर श्रीकृष्णनगर येथे कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बांधून पाणी अडवून सार्वजनिक गणेश विसर्जनासाठी गणेश घाट, जलक्रिडा, पर्यटनासाठी वापर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, व त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही. श्रीकृष्ण नगर येथील दहिसर नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बाधून सदर परिसराचे सौदर्यीकरण व बोटींग सुविधा उपलब्ध करुन देण्याचा माजी स्थानिक लोकप्रतिनिधीचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिको प्रशासनास प्राप्त झाल होता. सदर बंधा-यांतील पाण्याचा उपयोग सावर्जनिक गणेश विसर्जनासाठी गणेश घाट, जलक्रिडा, पर्यटनासाठी वापर करण्याबाबतचा ते प्रस्ताव होता. सदर बंधा-याच्या सर्वेक्षणाचे काम कार्यकारी अभियंता, ठाणे लघुपाटबंधारे विभागाने केले असून, त्यांनी अंदाजपत्रक व संकल्पचित्र सादर करतेवेळी उपरोक्त बंधा-यामुळे अंदाजे ०.०२६ दशलक्ष घनमीटर इतका पाण्याचा साठा उपलब्ध होऊ शकेल असे संकल्पित केले होते.

तथापि महापालिकेने नेमणुक केलेल्या सल्लागार मेसर्स एम.डब्ल्यु,एच.(इंडिया) प्रा.लि. यांच्या अभिप्रायामध्ये, दहिसर नदीवर श्रीकृष्ण नगर येथे प्रवाहाच्या वरील बाजूस अंदाजे ६०० मी अंतरावर यापूर्वीच एक बंधारा अस्तित्वात असल्याने आणखी एक बंधारा बांधल्यास ताशी ५० मी.मी. तीरितेचा पाऊस झाल्यास श्रीकृष्ण नगर व नॅशनल पार्क परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे असे नमूद केले आहे. तसेच ताशी १०० मी.मी. तीव्रतेचा पाऊस झाल्यास बंधारा अस्तित्वात नसतानाही पूरसदृश्य स्थिती निर्माण होऊ शकेल, यास्तव सदर ठिकाणी कोल्हापूर पध्दतीच बंधारा बांधण्याचा प्रस्ताव सल्लागारांनी संयुक्तीक होणार नसल्याचे सल्लागारांनी त्यांच्या महानगरपालिकेने सदरचा प्रस्ताव रद्दबातल करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे तेथे होणा-या पाण्याच्या साठ्याच्या उपयोगाबाबत प्रश्न उद्भवत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण कंपनीकडून उल्हासनगर शहरासाठी मंजूर योजना अद्यापही पूर्ण झाल्या नाहीत**

**(१०) २४५५ (२३-१२-२०१४). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीकडून उल्हासनगर शहरासाठी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन १ तथा आर.पी.बी.आर.पी. हे अनुक्रमांक १२.५६ करोड रुपये व रु.१६.५५ करोड रुपयांचे २००८ मध्ये यास मंजूरी मिळाली असून हे काम सन २०१० मध्ये पूर्ण होणार होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम हे अद्यापही पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन हे उपक्रम पुर्ण होणे करिता कोणती उपाययोजना करीत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) अशंतः खरे आहे. महावितरण कंपनीकडून उल्हासनगर शहरासाठी पायाभूत आराखडा योजना १ (इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन १) आणि आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेअंतर्गत अनुक्रमे रु.२५.२४ कोटी व रु.२६.८ कोटीची मंजूरी मिळाली व सदर कामाचा निविदानुसार कंत्राट पूर्ण करण्याचा कालावधी अनुक्रमे मार्च २०१३ व फेब्रुवारी,

२०१४ असा होता. सदर कंत्राटदारास कामे पूर्ण करण्यास दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

(२) व (३) स्थानिक भौगोलिक अडचणीमुळे सदर कामे पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सदर कामाबाबत कंत्राटदारास कामाच्या प्रगतीचा वेग कमी असल्यामुळे व कामाच्या प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी "नोटीस टू करेक्ट" देण्यात आली आहे. उर्वरित व प्रगतीपथावर असलेली कामे लवकर पूर्ण करण्याचे निदेश महावितरणाकडून संबंधित कंत्राटदाराला देण्यात आलेले आहेत. आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेअंतर्गत उर्वरित कामाकरिता नव्याने फेरनिविदा परिमंडळ स्तरावर काढण्यात आले असून सदर निविदा प्रक्रिया चालू आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा व भद्रावती तालुक्यातील ३३ के.व्ही सब स्टेशनमध्ये आवश्यक असलेले ट्रान्सफॉर्मर परिपूर्ण नसल्याबाबत**

**(११) २४६३ (१५-०१-२०१५). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा व भद्रावती तालुक्यातील ३३ के.व्ही विद्युत सब स्टेशनमध्ये आवश्यक असलेले ट्रान्सफॉर्मर पूर्ण आहेत काय,

(२) नसल्यास, किती ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता आहे व मागणी पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर तालुक्यातील गत ३ वर्षापासून किती शेतकऱ्यांनी पंपाकरिता विद्यूत मिटरची मागणी केली तसे किती शेतकऱ्यांनी याकरिता डिमांड ड्राफ भरलेला आहे व त्यापैकी किती शेतकऱ्यांना विद्युत मिटर देण्यात आली व अद्याप विद्यूत मिटर न देण्याची कारणे काय आहेत,

(४) उक्त तालुक्यात दिवसां वन फेज विद्युत पुरवठा सुरु असल्यामुळे शेतकरी ओलित करु शकत नसल्यामुळे शेतीपिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) शेतकऱ्यांना शेतीच्या कामाकरिता दिवसा थ्री फेज विद्युत पुरवठा करण्याकरिता महावितरणाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) वरोरा व भद्रावती तालुक्यातील उपकेंद्रातील सध्या अस्तित्वात असणा-या पॉवर ट्रान्सफार्मर ची क्षमता सध्याच्या मागणीच्या तुलनेत (लोड) पुरेशी आहे. तथापि, भविष्यात होणारी वाढ विचारात घेता वरोरा व भद्रावती तालुक्यातील आठ नवीन उपकेंद्रे (१६ ट्रान्सफार्मर) तसेच सध्या अस्तित्वात असणा-या उपकेंद्राची क्षमता वाढ विविध योजनांमध्ये प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) वरोरा व भद्रावती तालुक्यात ३१५१ शेतक-यांनी पंपाकरीता विद्युत मीटरच्या मागणी करीता अर्ज भरले होते. त्यापैकी ३१३० शेतक-यांनी डिमांड ड्राफ्ट भरले असून १८९३ शेतक-यांना विद्युत मीटर कनेक्शन दिले व १२३७ शेतक-यांना विद्युत मीटर देण्याचे प्रलंबित आहे. सदर शेतक-यांना विज जोडणी देण्याचे काम ज्येष्ठता यादीनुसार प्रगती पथावर आहे.

(४) नाही.
(५) सध्याची वीजेची उपलब्धता व मागणी यांची तुलना केल्यास राज्यातील सर्व कृषी ग्राहकांना आठवड्यातील सातही दिवस दिवसा विद्युत पुरवठा करण्याची संभावना कमी आहे.

---

**ठाणे परिसरामध्ये प्रवासी जलवाहतुक सुरु करणेसंदर्भात**

**(१२) २४७५ (१५-०१-२०१५). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे परिसरामध्ये प्रवासी जलवाहतुक सुरु करण्याचा निर्णय होऊनही निधी अभावी जलवाहतुक सुरु होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई परिसरामधील दिवा, वाशी व कारावे येथील प्रवासी जेट्टींची कामे हाती घेण्यात आली असून त्यांसाठी वन विभागाची परवानगी मिळविण्याची प्रक्रियाही प्रगतीपथावर आहे. ठाणे परिसरातील गायमुख येथील पर्यटनस्थळाचे जेट्टी हाऊसबोट व साहसी क्रिडा संकुल म्हणून विकास करणे या कामाच्या रु.१३.०८ कोटी किमतीच्या अंदाजपत्रकास ठाणे महानगरपालिकेकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यत आलेली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खारघर व ऐरोली टोल नाक्यावर नवी मुंबईतील वाहने टोल फ्री करणेबाबत**

**(१३) २४८० (२४-१२-२०१४). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील वाहने ठाणे, मुंबईकडे जाताना त्यांना ऐरोली व ठाणे या दोन्ही टोल नाक्यांवर टोल भरावा लागता तसेच पनवेलकडे जाताना खारघर टोल नाक्यावरही टोल भरावा लागतो तसेच शासन धोरणानुसार दोन टोल नाक्यामधील अंतरापेक्षा ऐरोली - ठाणे व ऐराली - खारघर या टोल नाक्याचे अंतर कमी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऐराेली व खारघर या दोन्ही टोल नाक्यांवर नवी मुंबईतील वाहनांना टोल भरावा लागत असल्याने त्यांना दुहेरी आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबईतील आरटीओ पासींग एम एम ४३, या वाहनांना खारघर व ऐरोली हे दोन्ही टोल नाके टोल फ्री करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निवेदाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार खारघर व ऐरोली टोल नाके नवी मुंबईतील आर. टी. ओ. पासींग एम.एच. ४३ वाहनांना टोल फ्री करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५) :** (१) व (२) नाही.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केलेल्या कामाकरीता एरोली व ठाणे (मुलुंड पूर्व) पथकर नाके मुंबई प्रवेशाचे पाच पथकर नाके प्रकल्पांतर्गत आहे. तर खारघर पथकर नाका हा सा.बां. विभागाकडून केलेल्या सायन पनवेल महामार्गाच्या कॉन्क्रीटीकरणाच्या प्रकल्पासाठी आहे.
(३) व (४) मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशी नुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ऊस तोड कामगारांच्या कल्याणासाठी राज्य कल्याणकारी मंडळ स्थापन करणेबाबत**

**(१४) २६३१ (२३-१२-२०१४). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तसेच चाळीसगांव तालुक्यातील ऊस तोड कामगारांच्या कल्याणांसाठी राज्य कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचे योजिले आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यात कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (२५-०३-२०१५) :** (१) राज्यातील ऊस तोड कामगारांचे जीवनमान आर्थिकदृष्टया अधिक सुरक्षित करुन त्यांना मजूरीचे सुरळीत वाटप करण्यासाठी माथाडी अधिनियम, १९६९ अंतर्गत मंडळ स्थापन करण्याची घोषणा शासनाने सन २०१४ च्या नागपूर येथील अधिवेशना दरम्यान दिनांक १२/१२/२०१४ रोजी केली आहे, ही खरे आहे.
(२) ऊस लागवड क्षेत्रातील ऊसाची तोडणी, तोडलेला ऊस वाहून नेणे, त्याची भराई/उतराई इ. अनुषंगिक कामाचा माथाडी अधिनियमाच्या अनुसूचीत समावेश नसल्याने अधिनियमाच्या कलम २६ मधील तरतूदीनुसार या रोजगाराचा समावेश अधिनियमाच्या अनुसूचीत करण्यासाठीची मसूदा अधिसूचना ९० दिवसांच्या कालावधीची सूचना देवून परिणामित होण्याचा संभव असणा-या सर्व व्यक्तींच्या माहितीस्तव दिनांक २६/२/२०१५ प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्वसामान्य नागरीकांना घर बांधायचे असेल किंवा बिल्डरांना जमिनीचा विकास करायचा असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ मध्ये जमिनीच्या बिगरशेतीची असलेली अट रद्द करण्याबाबत**

**(१५) २८१४ (२२-१२-२०१४). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य नागरीकांना घर बांधायचे असेल किंवा बिल्डरांना जमिनीचा विकास करायचा असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ मध्ये जमिनीच्या बिगरशेतीची असलेली अट रद्द करण्याबाबतचा वटहुकुम राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०१४ च्या तीस-या आठवडयात वा त्यासुमारास काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील वटहुकुमातील तरतूदीचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी राज्यात करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी अद्याप करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०४-२०१५) :** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ व ४४ मध्ये नमूद अकृषिक परवानगीच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याकरिता दि.२२ ऑगस्ट, २०१४ रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला होता.

(२) राज्यशासनाने अकृषिक परवानगी सुलभिकरणाबाबत निर्णय घेतला असून यानुसार राज्यातील ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर योजना अधिनियम १९६६ मधील तरतुदीच्या अन्वये विकास योजना अंतिम मान्यता प्राप्त अथवा प्रारुपरित्या प्रसिध्द करण्यात आली आहे, अशा क्षेत्रातील भागवटदार वर्ग-१ जमिनीकरिता जमिनधारकास विकास आराखड्यामध्ये दर्शवलिेल्या प्रयोजनाकरिता अकृ षिक पूर्वपरवानगीची आवश्यकता राहणार नाही. या क्षेत्रातील भागवटदार वर्ग-२ जमिनीकरिता महसूल प्राधिकारी यांनी केवळ जमीन विष्यक दस्तावेजांची तपासणी करुन व पात्र असल्यास नजराणा व शासकीय देणी यांचा भरणा करुन घेऊन नाहरकत परवाना देण्यात येईल. या क्षेत्राशिवाय उर्वरित सर्व क्षेत्राकरिता तसेच ज्या क्षेत्राकरिता प्रादेशिक नियोजन आराखडा प्रारुपरीत्या प्रसिध्द करण्यात आला आहे वा अंतिमतः मंजूर करण्यात आला आहे. अशा सर्व क्षेत्राकरिता ही अकृषिक परवानगीची कार्यपध्दती सुलभ करण्यात आली आहे. सदर अध्यादेशाचे रुपांतर नंतर विधिमंडळाच्या मान्यतेने अधिनियमात करण्यात आले असून सदर तरतूद अंमलात आणण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड शहरातील एलबीटी तातडीने रदद करण्यासाठी व्यापा-यांनी महानगरपालिकेवर काढलेला मोर्चा**

**(१६) २८७७ (२३-१२-२०१४). श्री. हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेवर माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास शहरातील व्यापा-यांनी एलबीटीच्या प्रश्नावर महामोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही जाचक एलबीटी तातडीने रद्द करण्याची मागणी व अन्य मागण्या या व्यापारी संघटनाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३)

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेला स्थानिक संस्था कर रद्द करण्याबाबत विविध व्यापारी संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली असून स्थानिक संस्था कर रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मौजे अघई (ता.वाडा,जि.ठाणे) येथील अघई-शिरीषपाडा या रस्त्यांची झालेली दूरावस्था**

**(१७) २९०९ (२३-१२-२०१४). श्री. शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अघई (ता.वाडा, जि.ठाणे) येथील अघई-शिरीषपाडा या रस्त्यांची दुरावस्था झालेली असून त्यामुळे विद्यार्थी व प्रवाशांचे अतोनात हाल होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेचा अधीनतेने हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील तहसिल कार्यालयातून वेगवेगळे दाखले देण्यासाठी दलाल करवी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याबाबत**

**(१८) २९२३ (२२-१२-२०१४). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील तहसिल कार्यालयातून वेगवेगळे दाखले देण्यासाठी दलाला कडून विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे जुलै, २०१४ च्या पहिल्या आठवडयात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कल्याण येथील तहसिल कार्यालयात दाखल्यासाठी विद्यार्थ्यांची पैश्याची होत असलेली फसवणूक थांबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०४-२०१५)** : (१), (२), (३) व (४) या संदर्भात एक दलाल नागरिकांच्या गैरुायदा घेत असल्याची घटना निदर्शनास आल्याने तहसीलदार कल्याण फुले पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा नोंदविला असून, पोलीस तपास चालू आहे. तसेच, तहसीलदार कलयाण जि.ठाणे यांनी प्रमाणपत्र मिळण्यासाठी दलाल/अन्य व्यक्तींची मदत न घेण्याचे आवाहन नागरीकांना केले आहे. तालुकयात विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी शिबीर अभियान राबविण्यात आले आहे. सेतू सुविधा केंद्रामार्फत कल्याण सेतू केंद्राची मोबाईल एसएमएस सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून, कलयाण सेतू केंद्राचे संकेतस्थळही सुरु केले आहे.

---

**सागरी पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याबाबत**

**(१९) २९५५ (१५-०१-२०१५). श्री. विलास तरे (बोईसर), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचे आस्थापनेवरील कशिमिरा, मीरारोड, भाईंदर, पोलीस अधिक्षक पालघर ग्रामीण नालासोपारा, माणिकपूर, वसई, विरार, व नियोजित नवघर अशी ८ पोलीस ठाणे व अप्पर पोलीस अधिक्षक, वसई, उपविभागीय पोलीस अधिकारी, वसई व उप विभागीय पोलीस अधिकारी, मींरारोड ही पदे मिळून परिमंडळ ६ निर्माण करणे पर्याप्त नाही म्हणून त्याऐवजी वसई पोलीस आयुक्ताच्या किंवा सागरी पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलिस महासंचालक कार्यालयाने त्यांचे पत्र क्र. पोमस. /२६- अ/४७/ठाणे ग्रामीण /(विभाजन)/१०५/२००७, दि. ८ डिसेंबर, २०११ अन्वये शासनास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१५)** : (१) व (२) होय हे खरे आहे. तथापि, दि. १.८.२०१४ पासून ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन पालघर जिल्ह्याची निमीर्ती करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यात एकुण १६ पोलीस ठाणे तसेच वसई, पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड या तालुकयांचा समावेश करण्यात आला आहे.

अपर पोलीस अधीक्षक, वसई उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर, बोईसयर व डहाणू ही पदे पोलीस अधिक्षक, पालघर यांचे आस्थापनेवर वग्र करण्यात आलेली आहेत. नवीन

पोलीस आयुक्तांलय निर्माण केले तर पालघर व ठाणे जिल्ह्यात पोलीस घटकासाठी अत्यंत कमी कार्यक्षेत्र शिल्लक राहणार आहे. म्हणून नवीन वसई पोलीस आयुक्तालय निर्माण करणे उचित नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटण (जि.सातारा) येथील पवनचक्की कंपन्यांकडून**
**ग्रामपंचायतींना वार्षिक कर मिळत नसलेबाबत**

**(२०) २९७२ (१५-०१-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण विधानसभा मतदारसंघातील सह्याद्रीच्या पठारावर असणा-या विविध पवनचक्की कंपन्यांकडून संबंधित ग्रामपंचायतींना करापोटी रक्कम देणेसंदर्भात शासनाकडून जिल्हा परिषद व पंचायत समितींना सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सह्याद्रीच्या पठारावर असणा-या विविध पवनचक्की कंपन्यांकडून संबंधित ग्रामपंचायतींना करापोटी द्यावयाच्या रक्कमेसंदर्भात कंपन्यांकडून चालढकल सुरु असून अनेक रुपयांची थकबाकी संबंधित पवनचक्की कंपनीकडे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या क्षेत्रात असणा-या ग्रामपंचायतीनी या कंपन्यांकडे वारंवार मागणी करुनही संबंधित कंपन्या रक्कम देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत राज्य शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, ग्रामपंचायतींना तातडीने पवनचक्की कंपन्यांकडून रक्कम मिळण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०४-२०१५) :** (१) शासनाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र कर व फी नियम १९६० मध्ये सुधारणा करण्यात येवून, पवनचक्कीकरिता आवश्यक मनोरे, दळवळणाकरिता आवश्यक मनोरे, तसेच इतर प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे मनोरे आणि त्यांची कार्ये पार पाडण्याकरिता आवश्यक असलेल्या खुल्या जागा यावर कर आकारणी करण्याची कार्यपध्दती निर्धारित करण्यात आली आहे.

(२) व (३) होय, अंशतः खरे आहे.

ग्रामपंचायतींकडून आकारल्या जाणा-या करांविरोधात काही कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या असून, काही कंपन्या वसुलीच्या रकमा ग्रामपंचायतीकडे जमा करत आहेत.

(४) व (५) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० मधील तरतूदीनुसार कर वसुलीची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी जिल्हा परिषदेने दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ च्या परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून संबंधित ग्रामपंचायतींकडून कर वसुलीची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन घेणेबाबत सर्व संबंधित गट विकास अधिकारी यांना सुचित करण्यात आले आहे.

---

**राज्यातील ग्रामीण भागास राबविण्यात येणा-या स्वच्छ भारत मिशन योजनेबाबत**

**(२१) ३००७ (१५-०१-२०१५). श्री. गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने निर्मल भारत अभियान योजना बंद करुन त्याऐवजी दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन योजनेतून ग्रामीण भागातील वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी प्रत्येकी १२ हजार रुपयाचे अनुदान देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे,

(३) पुर्वीच्या निर्मल भारत अभियानामध्ये या योजनेचे सन २०१४-१५ मध्ये राज्यामध्ये किती उद्दिष्ट ठरविण्यात आले होते,

(४) त्यापैकी किती पूर्ण झाले,

(५) नवीन योजनेचे किती उद्दिष्ट सन २०१४-२०१५ मध्ये ठरविण्यात आले आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०४-२०१५) :** (१) होय,

केंद्र सरकारने निर्मल भारत योजनेचे नामकरण स्वच्छ भारत मिशन ग्रामीण असे करुन मिशन २ ऑक्टोबर २०१४ पासून राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये वैयक्तीक शौचालय बांधण्यासाठी रु. ९,०००/- (केंद्र हिस्सा) व ३,०००/- (राज्य हिस्सा) असे एकूण रु. १२,००/- प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) राज्यामध्ये या मिशनची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (वासो) नवी मुंबई यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(३) सन २०१४-१५ मध्ये निर्मल भारत अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालयांचे बांधकामाकरिता ५,९६,४०६ एवढे उद्दिष्ट निश्चित करण्यात होते. स्वच्छ भारत मिशन मध्ये देखील हे उद्दिष्ट कायम ठेवण्यात आले आहे.

(४) वरील उद्दिष्टापैकी माहे डिसेंबर, २०१४ अखेरीस राज्यामध्ये १,५४,८४५ एवढी वैयक्तीक शौचालये बांधून पूर्ण झाली आहेत.

(५) नवीन योजनेमध्ये म्हणजेच स्वच्छ भारत मिशन मध्ये देखील तेच उद्दिष्ट (५,९६,४०६) कायम ठेवण्यात आले आहे.

---

**आदिवासी वसतीगृहातील मुलांना आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(२२) ३०१० (२२-१२-२०१४). श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात ब्रम्हपूरी येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी १५० (मुलांसाठी) नविन वसतीगृह आदिवासी विभागाकडून मंजूर करण्यात आले असून सदर वसतीगृहाच्या बांधकामासाठी तांत्रिक मंजूरी घेवून नकाशासह अंदाजपत्रक आयुक्त, आदिवासी विकास विभाग नाशिक यांच्याकडे गेल्या सहा महिन्यापासून प्रलंबित अद्यापही मुलांच्या वसतीगृहाचे बांधकाम

करता आले नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना वसतीगृहापासून वंचित राहावे लागत असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथे मंजूर असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नविन वसतीगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी विभागामार्फतीने पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, सदर प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०४-२०१५) :** (१), (२) व (३) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, ब्रम्हपुरी येथील इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

सद्यस्थितीत सदर वसतिगृह भाड्याच्या इमारतीत सुरु असून प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार देय असलेल्या सोयी-सुविधा उपलब्ध असून कोणीही विद्यार्थी सोयी-सुविधांपासून वंचित नाही.

---

**जालना जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या रखडलेल्या योजनांबाबत**

**(२३) ३०९७ (१५-०१-२०१५). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाच सहा वर्षापूर्वी मंजूरी देण्यात आलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना अपुर्ण अवस्थेत अथवा सुरु न झालेल्या अशा अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे नागरिकांना पाणीपुरवठ्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळले, दोषी अधिका-यांविरोधात काय कारवाई झाली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०४-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

जालना जिल्ह्यात ग्रामीण पाणी पुरवठा योजने अंतर्गत ५-६ वर्षापूर्वी मंजूरी देण्यात आलेल्या सर्व योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी पुरवठ्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील गिरणी कामगारांना घरे मिळण्याबाबत**

**(२४) ३१५५ (२३-१२-२०१४). श्री. सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेल्या घरांपैकी बृहन्मुंबईतील बंद/आजारी कापड गिरण्यांमधील गिरणी कामगारांकरीता घरांची उपलब्धता तपासण्यासाठी, तसेच जिल्हा किंवा तालुक्याच्या ठिकाणी जमिनीची उपलब्धता तपासून गिरणी कामगारांच्या गृहनिर्माण सोसायट्यांना देण्याच्या पर्यायाबाबत शिफारस करण्यासाठी तत्कालीन सन्मा.महसूल मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यासाठी आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, सदरहू समितीचा अहवाल किंती कालावधीत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०४-२०१५) :** (१), (२), (३) व (४) या संदर्भात शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दिनांक १६.४.२०१२ अन्वये मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. गिरणी कामगारांना अन्य जिल्हयामध्ये घरांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे या बाबीकरिता आतापर्यंत सदर समितीच्या ८ बैठका घेयात आल्या आहेत. समितीच्या पुढील बैठका सत्वर आयोजित करुन समितीचा अहवाल लवकरच शासनास सादर करण्याची तजवीज ठेवलेली आहे.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा धान्याचा पुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(२५) ३१७५ (२२-१२-२०१४). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा धान्याचा पुरवठा करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१५) :** (१) रत्नागिरी तालुकयातील काही शाळांत निकृष्ट दर्जाच्या धान्याचा पुरवठा झाला होता.

(२) व (३) निकृष्ट दर्जाच्या धान्याचा पुरवठा झालेल्या शाळातील खराब माल पुरवठेदाराकडून बदलून घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात झालेल्या अवकाळी पावसाने आणि ढगाळ वातावरणामुळे नगदी पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(२६) ३२८६ (२२-१२-२०१४). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अलिकडे झालेल्या अवकाळी पावसाने आणि ढगाळ वातावरणामुळे द्राक्ष, डाळिंब, सोयाबीन, मका, कांदा अशा नगदी पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. सोयाबीन व कापूस या पीकांना बाजारात कमी भाव मिळत आहे. अपुऱ्या पावसाने आधीच अडचणीत आलेला शेतकरी या नव्या संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासन सरसकट मदत करणार आहे काय, मदत करणार असले तर तीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०४-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ या कालावधीत वादळी वारा, अतिवृष्टी गारपीट व पुरपरिस्थिती यामुळे नुकसानग्रस्त शेतक-यांना राज्य शासनाने दिनांक ०४/०२/२०१५ रोजी शासन निर्णयान्वये विशेष पॅकेज मंजूर केलेले असून तयानुसार शेतीपिकांसाठी रु.१०.०००/- प्रति हेक्टर, आश्वासित सिंचनाखालील शेती पिकांना रु.१५,०००/- प्रति हेक्टर व फळपिकांसाठी रु.२५,०००/- प्रतिहेक्टर या दराने आर्थिक मदत जाहीर करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधित नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिळ-खार्डी (जि.ठाणे) येथील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२७) ३३२४ (२२-१२-२०१४). श्री. सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळ-खार्डी (जि.ठाणे) येथील रस्त्याची दुरावस्था झाल्याने सदर रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या आबालवृध्दांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०३-२०१५) :** (१), (२) व (३) दिवा रेल्वे स्टेशन ते शिळ फाटा हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग (प्रजिमा-६५) दर्जाचा असून रस्त्याची लांबी ०/००० ते ४/९१३ इतकी आहे. सदर लांबी पैकी कि.मी. ०/००० ते ३/२०० या लांबीमधील रस्त्याची प्रमुख राज्यमार्ग क्रमांक ४ म्हणून दर्जोन्नती झाली असून उर्वरित कि.मी. ३/२०० ते ४/९१३ ही लांबी ठाणे महानगर पालिकेकडे देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरीत केलेली आहे.

कि.मी. ०/००० ते १/५००० या लांबीत मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मार्च, २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले असून कि.मी. १/५०० चे ३/२०० या लांबीत विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मजबुतीकरण व डांबरीकराचे काम प्रगतीत असून निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**ठाणे जिल्ह्यात शिळ परिसरात सातत्याने होत असलेल्या खंडीत विद्युत पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाल्याबाबत**

**(२८) ३३२५ (१५-०१-२०१५). श्री. सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात शीळ परिसरात सातत्याने होत असलेल्या खंडीत विद्युत पुरवठ्यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकाराची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आणि शीळ परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) सदर वाहिनीचे जुनाट झालेला व बहुतांश जोड असलेला संपूर्ण उपरी तारमार्ग बदलण्याचे व वाढीव क्षमतेचे उपरी तारमार्ग टाकण्याचे अंदाजपत्रक मंजुर करण्यात आलेले असून. सदरहू कामाची ई-निविदा ठाणे इ. विभागातर्फे काढण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील शिळ, मुब्रा, कौसा, दिवा, फडकेपाडा, पडले भागातील नागरीक वाढत्या भारनियमनामुळे त्रस्त झाल्याबाबत**

**(२९) ३३२६ (१५-०१-२०१५). श्री. सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शिळ, मुब्रा, कौसा, दिवा, फडकेपाडा, पडले भागातील नागरीक सद्यःस्थितीत वाढत्या वीज भारनियमनामुळे त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरातील वीज भार नियमन रद्द वा कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.
(२) तांत्रिक हानी कमी व विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी आर.पी.डी.आर.पी (गतिमान विद्‌युत विकास व सुधारणा कार्यक्रम) योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच वीज चोरीला आळा घालण्यासाठी, विशेष विच चोरी पकडण्यासाठी मोहिम राबविण्यात आली आहे. नादुरूस्त वीज मीटर अथवा बंद असलेले वीज मीटर बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणात मोहिम राबवून वीज मीटर /आय.आर.(रेडिओ फ्रिक्वनेंसी इन्फ्रा रेड) मीटरने बदलविण्यात आले आहेत. ठाणे-३ विभागात महसूल वसुलीसाठी ५ ए.टी.पी.केंद्रे ६ कार्यालयीन केंद्रे व ११ महसूल वसुली केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील माणिकपुज धरणातून नांदगांव शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना तयार करण्याबाबत**

**(३०) ३३३८ (१५-०१-२०१५). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील माणिकपुज धरणातून नांदगांव शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना तयार करण्याची नाशिक जिल्ह्यातील लोकप्रितनिधींनी माहे मे, २०१२ मध्ये व तद्‌नंतर शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०४-२०१५) :** (१) होय.
(२) शासन निर्णय, दिनांक ५.४.२०१३ अन्वये सन २०१२-१३ च्या टंचाई कालावधीसाठी (माणिकपुज धरण उद्भव) रु.२४८.४४ लक्ष किंमतीची तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. सदरची योजना पूर्ण करण्यात आली असून योजना आजमितीस कार्यान्वित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित व शासकीय महाविद्‌यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर पदे भरण्याबाबत**

**(३१) ३३४३ (२२-१२-२०१४). श्री. वैभव पिचड (अकोले), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अकृषि विद्‌यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित व शासकीय महाविद्‌यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर पदे भरण्याबाबतचे निवेदन (पत्र) सहसंचालक, उच्च शिक्षण पुणे विभाग, पुणे यांनी सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्‌यालयांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०४-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) शासन निर्णय क्रमांक २०१३/४४७/१३/विशि-१, दि.२२.०१.२०१४ व शासन पुरक पत्र क्र.संकीर्ण-२०१३/८१/१३विशि-१, दि.२९.०१.२०१४ अन्वये अशासकीय अनुदानित महाविद्यालयांची बिंदू नामावली नुसान शिक्षक शिक्षकेत्तर पदे भरण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयाच्या दिनांक १२.०२.२०१४ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**महाराष्ट्र राज्य कोतवालांना चतुर्थ श्रेणीत २५ टक्के पदोन्नती व पेन्शन लागू करण्याबाबत**

**(३२) ३३५९ (२२-१२-२०१४). श्री. पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चतुर्थ श्रेणी २५ टक्के पदोन्नती व पेन्शनसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने दिनांक १० फेब्रुवारी २०१४ रोजी पासून राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोतवालांच्या न्याय मागण्या मार्गी लावण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०४-२०१५) :** (१) चतुर्थक्षेणी, २५ टक्के पदोन्नती व पेन्शनसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने दि. १० फेब्रुवारी, १४ पासून विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक येथे बेमुदत अन्नत्याग सत्याग्रह आंदोलन केले. इतर विभागीयआयुक्त कार्यालयासमोर अशाप्रकारचे आंदोलन झालेले नाही.
(२) कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा मिळवा संबंधी प्रस्ताव उचित निर्णयासाठी शासनस्तरावर विचाराधिन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमहदनगर जिल्ह्यात दरोडे व चोऱ्यांचे वाढलेले प्रमाण**

**(३३) ३३९४ (१५-०१-२०१५). श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात माहे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मोठ्या प्रमाणात दरोडे आणि चो-यांचे प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरोडे व चो-या रोखण्यास पोलीसांना अपयश येत असल्याने नागरिकांत तीव्र चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस वाढत असलेले दरोडे व चो-या रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणती कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही.

अहमदनगर जिल्हयात सन २०१३ मध्ये दरोड्याचे १८ गुन्हे दाखल झाले होते त्या तुलनेत सन २०१४ मध्ये ८ गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच सन २०१३ मध्ये चोरीचे ४०८ गुन्हे दाखल झाले होते त्यातुलनेत सन २०१४ मध्ये ३४६ गुन्हे दाखल झालेले आहेत. सबब दरोडे व चोरीच्या गुन्हयात सन २०१४ मध्ये घट झालेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

उक्त नमूद दरोड्यातच्या गुन्हयात २२ आरोपींना अटक करुन रु.११.४७ लक्ष किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच चोरीच्या गुन्हयात १९१ आरोपींना अटक करुन रु. ३७.६८ लक्ष किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत दरोड्याच्या तयारीत असलेल्या १० टोळ्या पकडण्यात आल्या आहेत. दरोडे व चोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी महत्वाच्या ठिकाणी नाकेबंदी करुन व्यक्ती व वाहनांची तपासणी करण्यात येते. रात्रीची गस्त कडक करण्यात आली आहे. तसेच दिवसाही महत्वाच्या ठिकाणी गस्त केली जाते. दरोडा प्रतिबंध पथक स्थापन करुन त्यांच्यामार्फतही महत्वाच्या रस्त्यावर /महामार्गावर रात्री गस्त करण्यात येते.
(४) विलंब झालेला नाही.

---

## नाशिक जिल्हयातील प्राथमिक शाळेतील मुलांच्या पोषण आहाराची पाकिटे पंचवटीतील दिंडोशी रोडवरील कचराकुंडीत आढळून आल्याबाबत

**(३४) ३४०० (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील प्राथमिक शाळेतील मुलांच्या पोषण आहाराची पाकिटे पंचवटीतील दिंडोशी रोडवर कचराकुंडीत आढळून आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१५) :** (१), (२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजवून विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करण्यात येते. सदर योजनेंतर्गत आहाराची पाकिटे पुरविण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (ता.जि.रायगड) येथील वाळण विभागातील बिरवाडी-वांरगी रस्त्याची दुरावस्था**

**(३५) ३४२८ (२२-१२-२०१४). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता,जि.रायगड) येथील वाळण विभागातील बिरवाडी-वांरगी रस्त्याची दुरावस्था झाली असून या भागात रस्त्याच शिल्लक राहिला नसून मुख्य रस्त्यावरील सुमारे ३० पेक्षा अधिक गांवातील ग्रामस्थांना खाच खळग्यांच रस्त्यावरुन प्रवास करावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करण्यात वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०४-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर रस्त्याच्या खराब झालेल्या लांबीतील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे व डांबराने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

सदर रस्त्याच्या कि.मी. ११/०० ते १७/०० या लांबीतील मंजूर असलेले काम निविदा स्तरावर असून सन २०१५-२०१६ या आर्थकि वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यातील जळालेल्या डीपीची दुरुस्ती करणेबाबत**

**(३६) ३४८६ (१५-०१-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि. औरंगाबाद) तालुक्यात माहे जानेवारी, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ अखेर किती वीजेच्या डीपी जळाल्या तसेच किती डीपीची दुरुस्ती तातडीने करण्यात आली व अद्याप किती दुरुस्तीची प्रकरणे प्रलंबित आहेत व सदर प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(२) तसेच, डिपी दुरुस्त करण्यास विलंब होत असल्याने शेतक-यांचे पाण्याअभावी नुकसान होत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५) :** (१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात माहे जानेवारी, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ अखेर ४८० वीजेची रोहित्रे नादुरुस्त झाली होती व त्यापैकी ४७३ रोहित्रे दुरुस्त करुन बदलविण्यात आलेली आहेत. सदरील रोहित्रे जेष्ठता यादीप्रमाणे बदलविण्यात येत आहेत. तसेच दिनांक २३.०२.२०१५ पर्यंत एकुण ०७ दुरुस्तीची प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) या ऐतिहासिक तीर्थक्षेत्र शहरातील वीजेचे भारनियमन बंद करणेबाबत**

**(३७) ३४९० (१५-०१-२०१५). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील पैठण हे शहर ऐतिहासिक तथा तीर्थक्षेत्राचे शहर आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तीर्थक्षेत्राच्या शहरात वीजेचे भारनियमन करण्यात येऊ नये असा शासनाने निर्णय घेतला असूनही पैठण शहरात वीजेचे भारनियमन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) राज्यातील आळंदी, देहू, पंढरपूर व अन्य तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वीजेचे भारनियमन करण्यात येत नसतानाही पैठण येथे भारनियमन करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, पैठण शहर वीजेच्या भारनियमनातून मुक्त करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) राज्यात सर्वत्र मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार वितरण व वाणिज्य हानी प्रमाणे वाहिनीनिहाय भारनियमन करण्यात येते.

(४) पैठण शहरामध्ये पुर्नरचित गतीमान ऊर्जा विकास प्रकल्प योजने अंतर्गत पायाभूत सुविधांची विविध कामे करण्यात आलेली आहेत. तसेच पैठण शहरातील वीज गळती रोखण्यासाठी अवैधरित्या वीज वापरणा-या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करणे. नविन वीज जोडण्या देणे, वीज ग्राहकांच्या देयकासंबंधीच्या तक्रारींचा निपटारा करणे. इ. कामे करण्यात येत आहेत.

पैठण शहरास ३ वाहिन्यांद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. त्यापैकी १ वाहिनी ब गटात असून सदर वाहिनी भारनियमनमुक्त आहे. तसेच उर्वरीत २ वाहिन्या ई गटात असून तेथे ६.१५ तास भारनियमन करण्यात येते.

---

**जायकवाडी प्रकल्पांतर्गत कामांसाठी सन २००९ ते २०१४ पर्यंत खर्च करण्यात आलेला निधी**

**(३८) ३४९४ (२३-१२-२०१४). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी प्रकल्पांतर्गत वेळोवेळी सन २००९ ते माहे मार्च, २०१४ पर्यंत विविध कामासाठी झालेला निधी कोणकोणत्या कामाकरिता खर्च झाला आहे,

(२) असल्यास, सदरची कामे देण्याची पध्दत यांची सविस्तर अचूक माहिती कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, बा.न. उत्तर, पैठण, जि.औरंगाबाद या कार्यालयाकडून अनेक नागरिकांनी मागणी करुनही दिली गेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत व ती तातडीने देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०३-२०१५) :** (१) सन २००९ ते मार्च २०१४ पर्यंत जायकवाडी प्रकल्पांतर्गत सर्व लेखा निर्षातंर्गत मिळून रु.६६८२ लक्ष इतका निधी खर्च झाला आहे. तो प्रामुख्याने पैठण व माजलगाव धरण यांची देखभाल दुरुस्ती, कालवा व वितरण प्रणालीची नियमित देखभाल दुरुस्ती तसेच पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या देखभाल या कामावर खर्च झाला आहे. वर्षवार तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **वर्ष** | **प्राप्त निधी (रु.लक्ष)** | **खर्च (रु.लक्ष)** |
|---|---|---|
| २००९-१० | १३८५.३४९ | १०५७.५३९ |
| २०१०-११ | १८३१.६५४ | १४३९.१३४ |
| २०११-१२ | १४०५.०१ | १०४३.४९१ |
| २०१२-१३ | १५५३.१६ | १३०२.३६ |
| २०१३-१४ | २२४७.८६ | १८३९.२५ |
| **एकूण** | **८४२३.०३३** | **६६८१.७७४** |

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ अखेर शेतीपंपाना वीजेचे कनेक्शन मिळण्याबाबत केलेले अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ३४९५ (२३-१२-२०१४). श्री. संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यातील किती शेतकऱ्यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ अखेर शेतीपंपाना वीजेचे कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केले आहेत,

(२) उक्त अर्जापैकी प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना वीजेची कनेक्शन दिली आहेत व अद्यापही किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) उर्वरित वीजेची कनेक्शन देण्याचे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व त्यांना तातडीने वीज कनेक्शन देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ५९६ शेतक-यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ अखेर शेतीपंपाना वीज जोडणी मिळण्यासाठी अर्ज केले आहेत.

(२) उक्त अर्जापैकी माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत ३४७ शेती पंप ग्राहकांना विज जोडण्या देण्यात आलेल्या असून २४९ वीज जोडण्या प्रलंबीत आहेत.

(३) प्रलंबित असलेल्या २४९ वीज जोडण्यापैकी १०० वीज जोडण्यांच्या डी.डी.एफ. योजनेमध्ये मंजूर आहेत व या वीज जोडण्यांसाठीच्या पायाभूत सुविधांचे काम ग्राहकांनी करावयाचे आहे. तसेच उर्वरित १४९ कृषीपंपाया पायाभूत सुविधाचे काम पायाभूत आराखडा योजना - २ अंतर्गत करण्यात येणार असून ती कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**दौंड तालुक्यासाठी (जि.पुणे) पायाभूत विकास आराखडा टप्पा-१**
**अंतर्गत महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या कामांबाबत**

**(४०) ३४९९ (१५-०१-२०१५). श्री. राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौड तालुक्यातील (जि.पुणे) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पायाभूत विकास आराखडा टप्पा क्र.१ अन्वये मंजूर केलेल्या नविन उपकेंद्र २, नविन उच्चदाब वाहिनी २४१ क्रि.मी., नविन लघुदाब वाहिनी ४२ कि.मी. व नविन वितरण रोहित्रे ९२७ या मंजूर कामांपैकी किती कामे पुर्ण झाली आहेत,

(२) सदर मंजूर कामांपैकी अद्यापही पुर्ण न झालेली कामे कोणती आहेत. व ही कामे पुर्ण न होण्यासाठी कारणे काय आहेत. तसेच अद्यापही पुर्ण न झालेली कामे पुर्ण करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने विकास आराखडा टप्पा क्र. २ अन्वये दौड तालुक्यासाठी (जि.पुणे) किती व कोणती कामे मंजूर केली आहेत व या टप्पा क्र.२ मधील कामांची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) व (२) पायाभूत आराखडा क्र.१ मधील ४६ नवीन वितरण रोहित्राव्यतिरिक्त सर्व कामे पूर्ण झाली आहेत. सदर प्रलंबित रोहित्रे पायाभूत सुविधा आराखडा - २ मध्ये समाविष्ट करून पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) दौंड तालुक्यात (जि.पुणे) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पायाभूत विकास आराखडा टप्पा क्र.२ अन्वये नवीन उपकेंद्र ६, नवीन उच्चदाब वाहिनी २६३ कि.मी. नवीन लघुदाब वाहिनी १९० कि.मी. व नवीन वितरण रोहित्रे ३९९ मंजूर केलेली आहेत.

---

**पेंच पाणी व्यवस्थापन उपविभाग रामटेक (जि.नागपूर)**
**अंतर्गत पाणी वाटपाच्या कामावरील मजूरांबाबत**

**(४१) ३५१८ (२३-१२-२०१४). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच पाणी व्यवस्थापन उपविभाग रामटेक (जि.नागपूर) अंतर्गत सन १९८७ पासून २००१ पर्यंत खरीब व रब्बी हंगामात पाणी वाटपाच्या कामावर स्थायी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी काही मजूर न्यायालयात गेले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यापैकी किती मजूरांना स्थायी करण्यात आले व मजूरांना अजूनपर्यंत स्थायी करण्यासंबंधी शासनाची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आजपर्यंत एकूण मजुरांपैकी स्थायी न करण्यात आलेल्या मजुरांना स्थायी करण्यास शासनस्तरावर कोणती कार्यवाही सुरु आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-०३-२०१५) :** (१) नाही. तथापि सन १९८७-२००१ पर्यंत हंगामी कामावर घेण्यात आलेल्या कामगारांपैकी २२ कामगाराना न्यायालच्या आदेशानुसार रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आले आहे.

(२) होय.

(३) व (४) २२ कामगारांना न्यायनिर्णयानुसार रुपांरती अस्थायी आस्थापनेवर घेण्यात आले आहे. तसेच ज्या मजुरांनी न्यायालयात दावे दाखल केलेले आहेत. त्यांचेबाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायनिर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर-मोहाडी तालुक्यात कृषी वीज पंप जोडणीसाठी विशेष अभियान राबविण्याबाबत**

**(४२) ३५३१ (१५-०१-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर-मोहाडी (जिल्हा भंडारा) तालुक्यात कृषी विज पंपाच्या जोडणी अभावी सिंचनाची बिकट समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास कृषी वीज पंप जोडणीसाठी विशेष अभियाना अंतर्गत किती कृषी वीज पंप जोडणीचे उद्दीष्टये देण्यात आले व त्यापैकी किती प्रमाणात उद्दीष्टांची पुर्तता करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) हे खरे नाही. फेब्रुवारी २०१५ अखरे असणा-या प्रलंबीत कृषीपंपाची संख्या तुमसर उपविभागात ९३ व मोहाडी उपविभागात २१२ असुन या कृषी पंपाना डिसेंबर २०१५ अखेर विद्‌युत पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

(२) अधिकाधिक प्रलंबित कृषी पंपाना लवकरात लवकर विद्‌युतपुरवठा करण्याबाबत

महावितरणचे धोरण आहे. सन २०१४-१५ मध्ये तुमसर उपविभाग ९८ व मोहाडी उपविभाग ३३६ कृषीपंपाना विद्युत पुरवठा करण्याचे उद्दिष्टे होते. वर्षे २०१४-१५ (फेब्रुवारी २०१५ पर्यत) तुमसर उपविभागात १६१ कृषीपंपाना व मोहाडी उपविभागात २५१ कृषी पंपाना विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील बावनथडी धरण प्रकल्पातील पाणीपुरवठा योजनांच्या कामांबाबत**

**(४३) ३५३२ (१५-०१-२०१५). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील बावनथडी धरण प्रकल्पातील पाणीपुरवठा योजनांच्या कामांबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत गोबरवाही येथे कार्यान्वित करण्यात आलेली ग्रामीण पाणीपुरवठा योजना १५ वर्षापासून प्रलंबित असल्याने नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जलकुंभ व जलवाहीन्यांची कामे पूर्ण करुन पाणीपुरवठा करण्याबाबत संबंधित विभाग व कंत्राटदाराने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामावरील मजूरांना मजुरी अदा न करण्याचे कारणे काय आहेत,
(४) या प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-०३-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) योजनेचा स्त्रोत बावनथडी प्रकल्प असल्याने व प्रकल्प २०१२ मध्ये पूर्ण झाल्याने योजना उशिरा कार्यान्वित करण्यात आली आहे.

---

**एकलारी ता. मोहाडी जि. भंडारा येथील सनप्लॅग स्टिल कंपनीत**
**८० टक्के स्थानिकांना नोक-या मिळणेबाबत**

**(४४) ३५४० (२३-१२-२०१४). श्री. चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकलारी, (ता. मोहाडी, जि. भंडारा) येथील सनप्लँग स्टील कंपनीत ८० टक्के स्थानीकांना बेरोजगारांना रोजगार मिळत नसल्याची प्रकरणी भारतीय जनता पक्षाचे व पंचायत समिती सदस्य रवि येळणे यांनी तक्रार केली, हे खरे आहे का,
(२) असल्यास, ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्यासंबंधी विभागाने किती स्थानिकांना रोजगार दिले व कोणती कार्यवाही केली,
(३) उक्त प्रकरणी स्थानीकांनी ८० टक्के रोजगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) एकलारी, ता.मोहाडी, जि.भंडारा येथील सनप्लॅग स्टिल कंपनीत पर्यवेक्षकीय श्रेणीमध्ये एकूण ६४९ रोजगार उपलब्ध असून, त्यामध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण ५०० इतके आहे. त्याची टक्केवारी ७७.०४ टक्के आहे. तसेच इतर श्रेणीत एकूण ५९० रोजगार उपलब्ध असून, त्यामध्ये स्थानिक लोकांचे प्रमाण ५११ इतके आहे. त्याची टक्केवारी ८६.६१ टक्के आहे.

सदर कंपनीने ८० टक्के स्थानिक लोकांचे प्रमाण शासन निर्णय दिनांक १७.११.२००८ नुसार राखले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यामध्ये टेंभू, ताकारी व म्हैसाळ या कालव्यावर सौरप्रकल्पाद्वारे वीज निर्मिती करणेबाबत**

**(४५) ३५७४ (२३-१२-२०१४). श्री. अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यामध्ये टेंभू, ताकारी व म्हैसाळ या कालव्यावर सौरप्रकल्पाद्वारे वीज निर्मिती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अधिक्षक अभियंता सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांचेकडे मागणी गेल्या ६ महिन्याच्या कालावधीत अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) सांगली जिल्ह्यामध्ये कालव्यावर सौरप्रकल्पाद्वारे वीज निर्मिती होऊ शकते असा सर्वे अपारंपरिक ऊर्जा विभागाच्या मेडा या संस्थेमार्फत केला आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) अद्यापही यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०३-२०१५) :** (१) नाही.

मा.आ.श्री. अनिल बाबर यांनी त्यांचे दिनांक १५.११.२०१४ चे पत्रान्वये टेंभू योजनेसाठी अशा स्वरुपाची एकदाच मागणी केलेली आहे.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापिठातील परिक्षांचे फेरतपासणी व पुनर्मुल्यांकनाचे निकाल अद्याप विद्यार्थ्यांच्या हाती न आल्याबाबत**

**(४६) ३५८४ (२२-१२-२०१४). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील कला, विज्ञान, वाणिज्य, पदवी आणि पदव्युत्तर शाखांच्या आधीच्या परिक्षांचे फेरतपासणी व पुनर्मुल्यांकनाचे निकाल अद्याप विद्यार्थ्यांचा हाती देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेळेत निकाल हाती न आल्याने विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचे नियोजन करणे अडचणीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिक्षांचे फेरतपासणी व पुर्नमुल्यांकनाचे निकाल अद्यापी विद्यार्थ्यांना न देण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांना त्वरीत त्यांचे सदरील निकाल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०३-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) विद्यापीठामार्फत ९५ टक्के विद्यार्थीचे फेरतपासणी व पुर्नमुल्यांकनाचे निकाल कालमर्यादेत लावण्यात आलेले आहेत. उर्वरित काही विद्यार्थ्यांचे निकाल सदर पुर्नमुल्यांकन अर्ज विलंबाने प्राप्त झाल्याने, पुर्नमुल्यांकन अर्जात चुकीची माहिती भरली गेल्याने, तसेच विशेष बाब म्हणून पुर्नमुल्यांकन अर्ज स्विकारण्यात आल्यास सदर पुर्नमुल्यांकनाचे निकाल जाहीर होण्यास विलंब झाला आहे. तथापि, सदर विद्यार्थ्यांनी तात्पुरते प्रवेश घेतले होते व निकाली जाहीर झाल्यानंतर त्यांचे प्रवेश महाविद्यालयात निश्चित झाले आहेत.

---

**लोहगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथे नविन ३३kv विद्यूत उपकेंद्र मंजूर करणे बाबत**

**(४७) ३६२० (१५-०१-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहगाव (ता.बिलोली, जि.नांदेड) येथे नविन ३३kv विद्यूत उपकेंद्रास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाची सद्य स्थिती काय आहे.

(३) मंजूरी दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०४-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंडलवाडी( ता.बिलोली जि.नांदेड) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करणे बाबत**

**(४८) ३६२४ (२३-१२-२०१४). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.बिलोली, जि.नांदेड) शहरासाठी व परिसरातील गावासाठी रुग्णांच्या उपचारासाठी कुंडलवाडी येथे कार्यरत असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र अपूरे पडत असल्यामुळे तेथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूरी बाबतची कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०४-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही

तथापि, आरोग्य सेवा संचालनालयाने या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय स्थापनेबाबत निकषानुसार तपासून अहवाल सादर करण्यास दि. २७.०१.२०१५ च्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, लातूर यांना सूचना दिल्या आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या ग्रामीण व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अद्ययावत क्रीडा शिक्षण देण्यासाठी क्रीडा मार्गदर्शकांची कायम तत्वावर नेमणूक करण्याबाबत**

**(४९) ३६४२ (२२-१२-२०१४). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अद्ययावत क्रीडा शिक्षण देण्यासाठी ५० क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्वावर नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांचेकडे दिनांक २५ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३१-०३-२०१५) :** (१) पदकविजेत खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने योजना राबविण्यात क्रीडा व युवकसेवा, संचालनालयाच्या आस्थापनेवर क्रीडा मार्गदर्शकांची १५३ पदे मानधन तत्वावर निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार सद्य:स्थितीत ६२ क्रीडा मार्गदर्शनाची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) मानधन तत्वावरील क्रीडा मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याची मागणी स्थानिक लोकप्रितनिधींनी त्यांच्या दिनांक ७.७.२०१४ च्या पत्रान्वये तत्कालीन मा.मंत्री, क्रिडा व युवक कल्याण यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) मानधन तत्वावरील क्रीडा मार्गदर्शकांची पदे पुर्णतः करार पध्दतीने भरण्याचा निर्णय

शासनाने घेतलेला असल्यामुळे या मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याची मागणी मान्य करता येणार नाही. तथपि मानधनावरील क्रीडा मार्गदर्शकांना शासनाकडून वेळोवेळी मुदतवाढ दिली जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील इंटिग्रेटेड डेअरी फार्म योजना बंद पडल्याबाबत**

**(५०) ५२६४ (०४-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील इंटिग्रेटेड डेअरी फार्म योजनेसाठी निवड झालेल्या खुलताबाद तालुक्यातील गोळेगाव आणि फुलंब्री तालुक्यातील पाथरी गावांची निवड झाली असता प्रत्येकी ४७ लक्ष १३ हजार खर्च करण्यात आला असताना त्या योजना बंद पडल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास याप्रकरणी, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या निष्कर्षानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. दोन्ही प्रकल्प सुरु आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.